# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावरील GOI Rank २०२३ मध्ये राज्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेस द्वितीय क्रमांक

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावरील GOI Rank २०२३ मध्ये राज्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेस द्वितीय क्रमांकाचे मानांकन मिळाले आहे. मा. पंतप्रधान महोदयांनी सन २०२५ ला भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यात केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत संशयित क्षयरुग्ण शोधणे, नवीन क्षयरुग्ण निदान करणे व त्यांना उपचारावर आणणे हे काम राज्यातील जिल्हा क्षयरोग अधिकारी व शहर क्षयरोग अधिकारी यांच्या मार्फत राबविले जाते. यासाठी केंद्रशासन स्तरावर मुख्य 9 निर्देशांकांचे गुणांकन करुन राज्याचे Ranking काढले जाते. त्याच धर्तीवर जिल्हा / शहर क्षयरोग केंद्र यांचे Ranking तयार केले जाते. जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधित निक्क्षय प्रणाली आधारीत अहवालांचे परीक्षण केले असता केंद्रशासनाच्या मुख्य ०९ निर्देशांकांमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने उत्तम काम केलेले निदर्शनास आले असून, त्याआधारे राज्याचा GOI Rank २०२३ तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने द्वितीय क्रमांक पटकविलेला आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त संजय शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकिशोर लहाने, क्षयरोग अधिकारी डॉ. बालनाथ चकोर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका कार्यक्षेत्रात क्षयरोग निर्मूलन जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात. भारत देश, महाराष्ट्र राज्य व मिरा भाईंदर शहर क्षयरोग मुक्त करण्यासाठी विविध प्रकारची उपचार पद्धती, शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मोलाचे योगदान आहे. क्षयरोग मुक्त शहर करण्यासाठी शहरातील नागरिकांचे योगदान देखील महत्त्वाचे राहणार असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले. केंद्र तसेच राज्य सरकारने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त भारत करण्याचे धोरण निश्चित केले आहे. क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास जवळच्या आरोग्य केंद्रात वैद्यकीय तपासणी करून घेणे, त्याचबरोबर आपल्या परिसरातील क्षयरोगाची लक्षणे असलेल्या व्यक्तीची माहिती आरोग्य केंद्रात देण्याचे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.